महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण

कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी-९, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. २६४७ २१३१ / २६४७ ४२११

जा.क्र.: का.औ.सं.वि./ब/नाट्य-क्रीडा/२०६५६

दिनांक : ०३/०५/२००८

म.रा.वि मंडळ
मांडुप (ग्रा.. प)मंडळ
आवक नं
दिनांक

# परिपत्रक

विषय : महावितरण कंपनी अंतर्गत वार्षिक नाट्य व क्रीडा स्पर्धा सन २००८-०९ च्या आयोजनाबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र. कामगार विभाग/ब/३२५७८ दि. १९/०९/२००६.
२) परिपत्रक क्र. काऔसंवि/ब-क्रीडा/३५८३१ दि. २९/०९/२००६.

मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी महावितरण कंपनी अंतर्गत विविध स्तरावर नाट्य व क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत खालीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

१) <u>नाट्यस्पर्धा</u> :

अ) **आंतर मंडलीय नाट्यस्पर्धा (Inter Circle)** माहे ऑगस्ट २००८ पर्यंत आयोजित करण्यात याव्यात.

ब) **आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धा (Inter Zonal)** कल्याण परिमंडळाच्या यजमानपदाखाली माहे सप्टेंबर २००८ च्या तिस-या आठवड्यात आयोजित करण्यात येतील. तत्पूर्वी सर्व परिमंडळानी आपापल्या आंतरमंडलीय नाट्यस्पर्धा आयोजित करुन प्रथम क्रमांक प्राप्त नाटकाची प्रवेशिका विहित नमुन्यातील प्रपत्रात मुख्य अभियंता, कल्याण परिमंडळ यांचेकडे दि.३०/०८/२००८ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावी.

नाट्यस्पर्धा आयोजनासाठी आर्थिक तरतूद :

अ) आंतरमंडलीय तसेच आंतरपरिमंडळीय पातळीवरील नाट्यस्पर्धेत भाग घेणा-या नाट्य संघास नाटकाचा सराव व सादरीकरणासाठी अनुदान रक्कम रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त) राहील.

ब) आंतर परिमंडळीय व आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान परिमंडळास / मंडलास नाट्यगृहाच्या भाड्यापोटी प्रति नाटक अनुदान रक्कम रु.७,०००/- (रु. सात हजार फक्त) राहील.

क) आंतर परिमंडलीय / आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान परिमंडळास / मंडलास नाटक सादरीकरण परवाना शुल्क, परीक्षकांचे मानधन, कलावंतासाठी स्नेहसंमेलन,

नाट्यस्पर्धा उद्घाटन व पारितोषिक वितरण सोहळा इत्यादिसाठी अनुदान रक्कम रु.३०,०००/- (रु.तीस हजार फक्त) राहील.

२) **क्रीडास्पर्धा :**

**अ) विभाग स्तरीय (आंतर उपविभागीय)** क्रीडास्पर्धा माहे सप्टेंबर २००८ मध्ये निवड चाचण्या घेऊन पूर्ण करव्यात. निवड चाचणीचा कालावधी फक्त एक दिवसाचा राहील.

**ब) मंडल स्तरीय (आंतर विभागीय )** क्रीडास्पर्धा माहे ऑक्टोबर २००८ मध्ये स्पर्धा / निवड चाचणी घेऊन पूर्ण कराव्यात. स्पर्धेचा कालावधी फक्त दोन दिवसांचा राहील.

**क) परिमंडळ स्तरीय ( आंतर मंडलीय)** क्रीडास्पर्धा माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये आयोजित करुन पूर्ण करण्यात याव्यात. स्पर्धेचा कालावधी फक्त तीन दिवसांचा राहील.

**ड) राज्य स्तरीय (आंतर परिमंडलीय)** क्रीडास्पर्धा **इनडोअर व आऊटडोअर** अशा दोन भागामध्ये आयोजित केल्या जातील.

**अ) आंतर परिमंडलीय इनडोअर** क्रीडा स्पर्धेमध्ये खालील खेळ / क्रीडा प्रकाराचा समावेश राहील. स्पर्धेचा कालावधी फक्त तीन दिवसांचा राहील.

**पुरुषांकरिता**

| अ.क्र. | खेळ / क्रीडा प्रकार | खेळाडू संख्या |
|---|---|---|
| १. | बॅडमिंटन | ०५ |
| २. | टेबल टेनिस | ०५ |
| ३ | बुध्दीबळ | ०१ |
| ४. | कॅरम | ०३ |
| ५. | ब्रीज | ०६ |
| ६. | कुस्ती | ०७ |

**महिलांकरिता**

| अ.क्र. | खेळ / क्रीडा प्रकार | खेळाडू संख्या |
|---|---|---|
| १. | बॅडमिंटन | ०३ |
| २. | टेबल टेनिस | ०३ |
| ३. | बुध्दीबळ | ०१ |
| ४. | कॅरम | ०३ |

आंतर परिमंडलीय इनडोअर क्रीडास्पर्धा अमरावती परिमंडळ अकोला यांच्या यजमानपदाखाली माहे डिसेंबर २००८ च्या दुस-या आठवड्यात आयोजित करण्यात येतील. तत्पूर्वी सर्व

मंडळांनी आंतरमंडलीय क्रीडास्पर्धा आयोजित करुन इनडोअर क्रीडा प्रकारात निवड झालेल्या खेळाडूंची यादी मुख्य अभियंता, अमरावती परिमंडळ, अकोला यांचेकडे दि. २९/११/२००८ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहचेल अशा रितीने पाठवावी.

**ब) <u>आंतर परिमंडळीय आऊटडोअर</u>** क्रीडा स्पर्धेमध्ये खालील खेळ / क्रीडा प्रकाराचा समावेश राहील. स्पर्धेचा कालावधी तीन दिवसांचा राहील. क्रिकेट या खेळाच्या स्पर्धा आंतर परिमंडळीय आऊटडोअर क्रीडा स्पर्धेचा निर्धारित होणा-या कार्यक्रमाच्या किमान एक दिवस अगोदर सुरु करण्यात येतील.

**<u>पुरुषांकरिता</u>**

| अ.क्र. | खेळ / क्रीडा प्रकार | खेळाडू संख्या |
|---|---|---|
| १. | क्रिकेट | १३ |
| २. | कबड्डी | १० |
| ३. | व्हॉलीबॉल | १० |
| ४. | मैदानी स्पर्धा (प्रत्येकी - १) (१००, २००, ४००, ८००, १५०० मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळी फेक, भालाफेक | १० |

**<u>महिलांकरिता</u>**

| अ.क्र. | खेळ / क्रीडा प्रकार | खेळाडू संख्या |
|---|---|---|
| १. | मैदानी स्पर्धा (प्रत्येकी - १) (१००, २०० मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळी फेक, भालाफेक | ०७ |

आंतर परिमंडळीय आऊटडोअर क्रीडा स्पर्धा कोंकण परिमंडळ, रत्नागिरी यांच्या यजमानपदाखाली माहे जानेवारी २००९ च्या दुस-या आठवड्यात आयोजित करण्यात येतील. तत्पूर्वी सर्व परिमंडळाने आंतरमंडलीय क्रीडास्पर्धेत आऊटडोअर क्रीडा प्रकारात निवड झालेल्या खेळाडूंची यादी मुख्य अभियंता, कोंकण परिमंडळ, रत्नागिरी यांचेकडे दि. ३१/१२/२००८ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहचेल अशा रितीने पाठवावी.

**<u>विविध स्तरावर क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी आर्थिक तरतुद</u> :**

क) विभाग स्तरीय (आंतर उपविभागीय क्रीडा स्पर्धा) रु. ४,०००/-

ख) मंडल स्तरीय (आंतर विभागीय क्रीडा स्पर्धा) रु. ८,०००/-

ग) परिमंडळ स्तरीय (आंतर मंडलीय क्रीडा स्पर्धा) रु. ३२,०००/-

घ) राज्यस्तरीय (आंतर परिमंडळीय इनडोअर क्रिडास्पर्धा) रु. ४०,०००/-

च) राज्यस्तरीय (आंतर परिमंडळील आऊटडोअर क्रिडास्पर्धा) रु. ६४,०००/-

सन २००८-०९ पासून व त्यानंतर भौगोलिक परिक्षेत्रानुसार कंपनीच्या वार्षिक नाट्य व क्रीडास्पर्धा आयोजनासाठी निश्चित केलेली परिमंडळे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | परिमंडळाचे नांव |
|---|---|
| १. | मुख्य कार्यालय (भांडूप नागरी परिमंडळासह) |
| २. | कल्याण परिमंडळ (कोकण परिमंडळ, रत्नागिरीसह) |
| ३. | अमरावती परिमंडळ, अकोला |
| ४. | कोल्हापूर परिमंडळ (पुणे परिमंडळासह) |
| ५. | औरंगाबाद परिमंडळ |
| ६. | लातूर परिमंडळ |
| ७. | नाशिक परिमंडळ |
| ८. | नागपूर परिमंडळ (नागपूर शहर परिमंडळासह) |

राज्य स्तरावर (आंतर परिमंडळीय) आयोजित केलेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत खेळाडूंचे क्रीडा कौशल्य व कसब पाहून त्यांची अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या वतीने आयोजित केल्या जाणा-या विविध खेळांच्या स्पर्धेसाठी निवड केली जाईल. असा निवड झालेला संघ प्रतिवर्षी अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या वतीने आयोजित केल्या जाणा-या त्या-त्या खेळाच्या स्पर्धेत महावितरण कंपनीच्या वतीने सहभागी होईल.

सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, विविध स्तरावरील नाट्य व क्रीडा स्पर्धेचे आयोजन वर दिलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात यावे तसेच स्पर्धा आयोजनानंतर स्पर्धेचा सविस्तर अहवाल १५ दिवसाचे आत सांघिक कार्यालयास सादर करावा.

सदर परिपत्रकास उपविभागीय कार्यालयापर्यंत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सादर :

क्षेत्रीय कार्यालयातील सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता.

प्रत रवाना :

१) उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, औरंगाबाद / अकोला / नाशिक / नागपूर / नागपूर शहर / लातूर / कोल्हापूर / कल्याण / रत्नागिरी / भांडूप / पुणे.

२) कामगार अधिकारी, जळगांव / सोलापूर / अमरावती / नांदेड / वर्धा / रत्नागिरी.

३) उप कामगार अधिकारी (क्रीडा), कल्याण / अकोला / औरंगाबाद / वर्धा.

E:\Backup Of Meena\D Drive\kam B on\natya kreeda\paripatrak.doc